# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/12/2021 (गुरूवार)


---

## हरविलेल्या व्यक्तीचा शोध
## पोलीस स्टेशन बेला, जि. नागपुर ग्रामीण

दि. 21/12/2021 रोजी पोलीस स्टेशन बेला येथील सपोनि पंकज वाघोडे, ठाणेदार बेला पोलीस स्टेशन व पोलीस स्टाफ सरकारी वाहनाने पेट्रोलींग करीत असता, न्यु पंजाबी ढाबा, चिमणाझरी येथील एका ईसमास विचारपुस केली असता, तो थोडा भोळसर असल्याने त्याने नाव सांगितिले नाही. परंतु त्याला विश्वासात घेवुन परत विचारले असता, त्याने आपले नाव राजु संपत सुसर रा. आमदाबाद तह. कन्नड जि. औरंगाबाद असे सागितले वरून सपोनि श्रीमती कोमल शिंदे, ठाणेदार, पिशोर पोलीस स्टेशन, तह. कन्नड जि. औरंगाबाद यांचेशी चौकशी केली असता, तेथे सबंधीत व्यक्तीची सन 2019 पासुन मिसींग दाखल असल्याची माहीती मिळाली. तसेच सदर ईसमाचे वडील व तेथील गावाचे पोलीस पाटील श्री ज्ञानेश्वर सोळुंके यांना माहिती दिली व ते स्वतःहुन पोलीस स्टेशन बेला येथे हजर आल्याने, हरविलेला ईसम नामे– राजु संपत सुसर रा. आमदाबाद तह. कन्नड जि. औरंगाबाद यास दिनांक 23.12.2021 रोजी त्यांचे ताब्यात देण्यात आले. दोन वर्षांनी वडिलांना त्यांचा मुलगा मिळाल्याने वडिलांनी बेला पोलीसांचे खुप आभार मानले.

सदरची कार्यवाही मा. श्री. विजयकुमार मगर, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण, मा. श्री. राहुल माकणीकर, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण, व मा. श्रीमती पुजा गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी नागपुर विभाग, नागपुर ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन बेला चे ठाणेदार श्री पंकज वाघोडे, सोबत स्टाफ पोहवा अजय चौधरी, पोहवा मारोती राउत, पोहवा संजय ईंगोले, पोहवा मनोज मेंडुले, व पोशि वसंता नागरे यांनी केली आहे.

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 02 कि. मी. अंतरावरील युनिवर्थ कंपनी जवळ एमआयडीसी बोरी येथे दिनांक 16/12/21 चे 12:00 वा. ते 12:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सजंय शेषराव लाडेकर, रा. डोगरगाव ता.हिगंणा जि. नागपूर हा दि. 16/12/21 रोजी 11:00 वा. सुमारास एमआयडीसी बोरी येथील युनिवर्थ कंपनी जवळील पुलीया जवळ त्याची एमएच– 40/बीझेड– 4971 क्रमांकाची मोटरसायकल उभी करून झोपी गेला. त्यानंतर तो 12:00 ते 12:30 वा. दरम्यान उठला असता त्याची मोटरसायकल दिसुन आली नाही. त्यादरम्यात अज्ञात आरोपीने फिर्यादीची कि. 45,000/– रू. मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार अशोक तरमळे मो.नं. 9823699185 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. केळवद :– अंतर्गत मौजा जटाम खोरा शिवार येथे दिनांक 21/12/2021 चे 15:00 वा. ते 15.30 वा. दरम्यान एम.एच– 31/ए.सी– 5909 क्रमांकाचा स्प्लेंडर मोटरसायकलचा चालक नामे– अरुण कृष्ण कुंभरे(मृतक), वय 22 वर्ष, रा. उमरी (जांभळापाणी) ता.सावनेर याने त्याची मोटरसायकलवर सुशील भलावी रा. धापेवाडा यास बसवुन आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने मोटरसायकल स्लिप होवून ते दोघेही खाली पडले. या अपघातात मोटरसायकलचा चालक अरुण कुंभरे हा गंभीर जखमी होवुन स्वताच्या मरणास कारणीभुत ठरला. तसेच सुशील भलावी यास जखमी करण्यास आरोपी कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रामकृष्ण मोतीराम कुंभरे, वय 45 वर्ष रा. उमरी (जांभळापाणी) ता.सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री सोनवणे हे करीत आहे.

2) पो.स्टे. केळवद :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील भदी पिपळा येथे दिनांक 22/12/2021 चे 19:45 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मिलींद सुर्यभान पाटील, वय 36 वर्ष रा. मांडवी, ता.कळमेश्वर, जि. नागपूर व त्याचे सोबत असलेले सुरेश हरी पलांघर (मृतक), वय 32 वर्षे रा. आष्टा पिपरीया ता. बरघट जि.शिवनी असे दोघेही मिळून आपली हिरो पॅशन एक्स्प्रो विना क्रमांकाची मोटारसायकल ने सावनेर वरून शिवतीर्थ उमरी येथे जात असता मागून येणाऱ्या अज्ञात कार चालकाने आपली कार भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून मोटरसायकला मागुन धडक दिली. या अपघातात मोटारसायकल वर मागे बसलेला सुरेश हरी पलांघर हा रोडवर पडल्याने त्याच्या डोक्याला गंभीर जखम झाल्याने उपचारादरम्यान सरकारी दवाखाना सावनेर येथे मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134, 177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री उमेश नासरे मो.क्र. 9923131507 हे करीत आहे.

## खंडणी मागणी

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत इंडीगो डेनिम प्रा.लि.एमआयडीसी बोरी येथे फिर्यादी नामे– रूदैश सुखदेवराव गेडाम वय 54 वर्ष रा. हेड ऑफिस द रॉकबिल्डींग हिल रोड शिवाणी नगर, नागपूर हे इंडिगोडेनिम प्रा.लि. कंपनी एमआयडीसी बोरी येथे जनरल मॅनेजर पदावर नौकरीवर करतात. यातील आरोपी नामे– जितेन्द्र मेश्राम रा.बुटीबोरी याने दि. 11.11.21 रोजी कंपनीचे एचआर मॅनेजर नामे मुंगेलवार यांना एमपीसीबी चे अधिकारी यांना कंपनीत पाठवुन कंपनीत बंद करण्याची धमकी देवुन 10,000/–रू. ची खंडणीची मागणी करून दि. 25.11.21 रोजी 12:45 वा रक्कम स्विकारली व परत 10 टन लोखंडाची मागणी करून न दिल्यास वर्तमान पत्रात बातमी छापुन कंपनीची बदनामी करण्याची धमकी देवुन परत खडंणी मागण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 384, 385 भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार अशोक तरमळे मो.नं. 9823699185 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 12 कि.मी. अंतरावरील मौजा खात येथे प्रमोद श्रावणजी धावळे (मृतक), वय 38 वर्ष रा.खात व त्याची पत्नी यांचे भंडारा कोर्टात खावटीची केस चालु आहे. त्यामुळे त्याला नैराश्य आले होते तसेच तो नेहमी दारू पित होता. दिनांक 22/12/2021 रोजी सायंकाळी 07.00 वा. दरम्यान फिर्यादी व आजुबाजुचे लोंकांनी प्रमोदचे घराचा दरवाजा ठोठावल परंतु आतुन दरवाजा बंद होता. म्हणुन सर्वांनी दरवाजा तोडुन आत प्रवेश केला असता फिर्यादीचा भाउ प्रमोद हा लाकडी दिवाणावर झोपुन होता. त्यानंतर गावातील डॉक्टर यांना बोलावण्यात आले डॉक्टरांनी त्यास तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अनिल श्रावणजी धावळे, वय 43 वर्ष रा.खात यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक राजेन्द्र पुडके मो.ने. 9823331162 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत आनंदनगर कन्हान येथे दिनांक 22/12/2021 चे 07.00 वा. ते 07.30 वा. सुमारास रजत ईश्वर कडबे(मृतक), वय 25 वर्ष, रा. आनंदनगर कन्हान याने अज्ञात कारणावरून त्याच्या राहते घरी समोरच्या खोलीत गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला. पो.स्टे जुनी कामठी येथुन सुचना व इतर कागदपत्र प्राप्त झाल्यावरून सदरचा मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अभय ईश्वर कडबे, वय 22 वर्ष रा. आनंद नगर कन्हान यांचे रिपोर्ट वरून पो. स्टे. कन्हान येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार अरून सहारे मो.क्र. 9309592512 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर